उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्रमांकः पकाबां-०९१७/प्र.क्र.२२४/परि-४

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ एप्रिल २०१८

वाचा :-

१) **परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. काईबां(०५)०२१७/न.क्र.०३/का.१०(१)/ जा.क्र.७२३०/८५७५,दि.०८.०५.२०१७ व दि.०२.०६.२०१७ ची पत्रे.**
२) **मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दि.१५.०२.२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

प्रस्तावना:-

महसूल व वन विभागाने शासन ज्ञापन क्र.जमीन-२७१२/प्र.क्र.२३५/ज-४, दि.०२.०९.२०१६ अन्वये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांना मौजे वाडेघर, ता.कल्याण येथील सर्व्हे क्र.५५ अ मधील क्षेत्र ८२२० चौ.मी. जागेचा सशर्त,मुल्यरहित व महसूल मुक्त ताबा दिला आहे. सदर जागेवर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकरिता नविन इमारत बांधण्यासाठीच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाचे नवीन इमारतीचे बांधकाम, मौजे वाडेघर, ता.कल्याण येथील सर्व्हे क्र.५५-अ, क्षेत्र १-३९-० हे.आर. या भूखंडामधील ८२२०.०० चौ.मी. जागेवर करण्याकरिता रु.१०,४६,२६,९४२/- (रुपये दहा कोटी शेहचाळीस लक्ष सव्वीस हजार नऊशे बेचाळीस फक्त) इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व नकाशांना दि.१५.०२.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत सचिव समितीने सहमती दर्शवली आहे. त्यास अनुसरून सदर कामाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे रु.१०,४६,२६,९४२/- (रुपये दहा कोटी शेहचाळीस लक्ष सव्वीस हजार नऊशे बेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेस शासन या आदेशाव्दारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

अंदाजपत्रकाचा तपशील आणि अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

Name of the Department: HOME DEPTT.					
Name of Work: Construction of Deputy Regional Transport Office building at Kalyan,Tah. Kalyan Distt.Thane					
RECAPITULATION SHEET					
Sr.No.	Particulars of item		Norms (unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)		Cost Rs.
(A)	ESSENTIAL ITEMS				
१	Building proper Scope				
	(a)Area (Sqmt.)	६७८.३७	२७५००	Per Sqmt.	१,८६,५५,१७५
	(b)Number of floors	GF			
	(a)Area (Sqmt.)	६७८.३७	२५०००	Per Sqmt.	१,६९,५९,२५०
	(b)Number of floors	FF			
	(a)Area (Sqmt.)	६७८.३७	२५०००	Per Sqmt.	१,६९,५९,२५०
	(b)Number of floors	SF			
	(c)Foundation in B.C./Weak Soil				
	(d)Cost of Construstion				**५,२५,७३,६७५**
२	**Electrification**	Internal	५% of १(d)		२६,२८,६८४
		External	६% of १(d)		३१,५४,४२१
			Total		**५७,८३,१०४**
३	**Water Supply and Sanitation**		५% - of १ (d)		**२६,२८,६८४**
४	**Miscellaneous Items**				
	Compound Wall & Cate	६००	८५००	Per Rmt.	५१ ,००,०००
	Internal Roads CC	३००	८५००	Per Rmt.	१८,००,०००
	Furniture	२०३५.११	८५००	Per Rmt.	१,०१,७५,५५०
	Rain Water Harvesting			Lump Sum	७,००,०००
	Fire Fighting Arrangements			Lump Sum	१५,००,०००
	Land Development & Gardening			Lump Sum	१५,००,०००
	Storm Water Drains	६००	८५००	Per Rmt.	३९,००,०००
	Flag Post			Lump Sum	३,००,०००
	Parking Arrangements			Lump Sum	५,००,०००
				Total	**२,५४,७५,५५०**
			Sub Total (T) = (१)+(२)+(३)+(४)		**८,६४,६१,०१३**
	Contingencies		४% of १(d)		२१,०२,९४७
	GST		१८% of १(T)		१,५५,६२,९८२
	Corporation Charges				५,००,०००
			Sub Total (A)		**१०,४६,२६,९४२**
(B)	OPTIONAL ITEMS				
Sr.No.	Items				
			Sub Total (B)		०
	TOTAL COST OF PROJECTS (A)+(B)				**१०,४६,२६,९४२**
	Say Rs. Lakhs				**१,०४६.२७**

(१) काम सुरू करण्यापूर्वी नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.
(२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
(३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग,शान निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
(४) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करावा.
(५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.एच,मुख्य लेखाशीर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (०८) परिवहन (०८)(१२) मोंठी बांधकामे योजनांतर्गत (४०५९ ०८२३)- ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा."

३. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-५, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सा.बां.नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७०/इमा-२, दि.१९.०९.२०१७ तसेच अनौप-१९०/इमा-१,दि.१५.०२.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१५२७१७६८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.17 15:31:09 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१२.उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती (परि-४).